महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

# अनुसूचित जमातीच्या उमेदवारांकडून संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा मुख्य परीक्षा, २०२४ तयारीकरीता प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य लाभ देणे योजनेसाठी अर्ज मागविणेबाबत...

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे ही एक नोंदणीकृत स्वायत्त संस्था आहे. सदर संस्थेमार्फत अनुसूचित जमातीतील युवक व युवतीसाठी सेवा पूर्व प्रशिक्षण धोरणांतर्गत संघ लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा कार्यक्रम राबविले जातात. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र . प्रशिक्षण -२०२० / प्र.क्र. ७५ / का. -०९ दिनांक १३ नोव्हेंबर, २०२० अन्वये, महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीतील उमेदवारांसाठी संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा मुख्य परीक्षा व मुलाखत तयारीकरीता आर्थिक सहाय्य देणे बाबत निर्णय घेण्यात आला आहे.

संघ लोकसेवा आयोग नागरी सेवा पूर्व परीक्षा, २०२४ **(UPSC)** उत्तीर्ण असलेले अनुसूचित जमातीतील पात्र उमेदवारांना नागरी सेवा मुख्य परीक्षा, २०२४ च्या तयारी करीता त्यांचा आवश्यक शैक्षणिक खर्च भागविण्यासाठी अर्थ सहाय्य मिळणेबाबत अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर अर्जाचा नमुना तसेच या बाबतचा सविस्तर तपशील, अनुसूचित जमाती वैधता प्रमाणपत्र, ई-समन्स किंवा संघ लोकसेवा नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२४ उत्तीर्ण झालेबाबतचे कागदपत्रे इ. बाबतच्या अधिक माहितीकरीता या कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळ **https://trti.maharashtra.gov.in/index.php/en/** ला भेट द्यावी.

अनुसूचित जमातीतील उमेदवारांची अर्हतेनुसार निवड करण्याचे अंतिम अधिकार **आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे** यांचेकडे राहतील.

**अर्ज सादर करण्याचा सुरू दिनांक : २६.०७.२०२४**
**अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक : १३.०८.२०२४**
**अर्ज सादर करण्याचे स्थळ : आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.**

(डॉ. राजेंद्र भारुड, भा.प्र. से.)
आयुक्त